**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२३१**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : १५ जानेवारी, २०११.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ७ जानेवारी, २०११ रोजी झालेल्या २३१ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव, १५।१।२०११
कार्यकारी समिती

**प्रति :**

मुख्य सचिव, — अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, — सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.एन्.व्ही.मिराणी — सदस्य
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५

डॉ.शिरीष संख्ये — सदस्य
संचालक,
मॅकन्सी अँड कंपनी, एक्सप्रेस टॉवर,
२१ वा मजला, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१

प्रधान सचिव (१), — सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३१वी बैठक

**दिनांक** : ७ जानेवारी, २०११ (शुक्रवार)

**वेळ** : सायंकाळी ५.०० वाजता

**स्थळ** : मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
५ वा मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य** :

| | | |
|---|---|---|
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन,<br>व | - | अध्यक्ष |
| महानगर आयुक्त, (अति.कार्यभार)<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |
| श्री.गौतम चॅटर्जी<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.सुबोध कुमार<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.तानाजी सत्रे<br>व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार),<br>सिडको | - | सदस्य |

**निमंत्रित** :

श्री.एस.व्ही.आर.श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त (१)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ.सतिश बागल
वित्त सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अड्सुमिली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.जी.गोडबोले
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.संपतकुमार
प्रमुख, (अति.कार्यभार)
नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.रा.वानखडे
उप महानगर आयुक्त (जमिनी व मिळकती)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.समीर उन्हाळे
उप महानगर आयुक्त (प्रशासन)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ४ मार्च, २०१० रोजी झालेल्या २३० व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २३० व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी बाब क्र.७ विषयीच्या कार्यवृत्तामध्ये काही बदल करण्यासंबंधी सूचना केलेल्या होत्या. त्याबाबत त्यांनी विचारणा केली. यासंदर्भात श्री.देशपांडे समितीचा दृष्टीकोन प्राप्त करुन घेण्यात आला असून त्याचा पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे असे श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी सांगितले.

१.२ श्री.मिराणी यांनी नवीन दरसूचीनुसार देणारी दरवाढ व कंत्राटदारांच्या मागण्या यापैकी एकच देण्यात यावे मात्र दोन्ही देण्यात येऊ नये, असे मत प्रदर्शित केले होते. याबाबत पुढील खुलासा करण्यात येत आहे.

१) कंत्राटदाराच्या मूळ मुदतीनंतर करण्यात आलेल्या कामासाठी परंतु जे काम मूळ कंत्राटामध्ये अंतर्भुत होते. अशा कामासाठी समितीच्या अहवालानुसार ४ भागामध्ये शिफारस करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

अ) मशिनरीच्या मूळ किंमतीसाठी (फिक्स कॉस्ट) लागणारे व्याज.

ब) मनुष्यबळ, यंत्रसामुग्री यामध्ये १०% देण्यात आलेली आगाऊ रक्कम (Mobilisation Advance) मुलभूत धरुन होणारी भाववाढ.

क) साधनसामुग्रीच्या किंमतीमध्ये संबंधित शासन निर्णयानुसार (Government Resolution) होणारी वाढ व संबंधित शासन निर्णय पूर्वलक्षित तत्वावर लागू करणे.

ड) ८% एवढा वरकड खर्च विचारात घेऊन होणारी वाढ.

२) जे काम कंत्राटदारांच्या मूळ मुदतीनंतर करण्यात आले व जे मूळ कंत्राटामध्ये अंतर्भूत नव्हते या कामासाठीच केवळ त्या वेळच्या प्रचलित दरसूचीनुसार दरवाढ देण्याची शिफारस केलेली आहे, त्यामुळे यातही पुनरावृत्ती होत नाही.

१.३ त्यानंतर, बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ४ मार्च, २०१० रोजी झालेल्या २३० व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने दिनांक ४ मार्च, २०१० रोजी झालेल्या २३० व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या जमिनींचे तसेच मिळकतींचे संरक्षणाकरीता बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची आणि मिळकत परिकरांची (Estate Attendants) सुरक्षा व्यवस्था पुरविणा-या पात्र सुरक्षा ठेकेदारांची तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

३.१ उपरोक्त बाब टिपणी संबंधात माहिती देताना अति.महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीने २३० व्या बैठकीतील पारीत केलेल्या ठराव क्र.११५४ अन्वये प्राधिकरणाच्या मालमत्तेचे संरक्षण व व्यवस्थापन करण्याकरीता, सेवा पुरविण्याकरीता सुरक्षा ठेकेदारांची रु.५,१००/- प्रति बंदुकधारी सुरक्षा रक्षक प्रतिमास आणि रु.४,८००/- प्रति मिळकत परिकर प्रतिमास या दराने (सर्व समावेशक दराने) नेमणूकीच्या तारखेपासून तीन वर्षाकरीता निविदेतील अटीं व शर्तीवर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यापूर्वी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे बंदूकधारी सुरक्षा रक्षक व मिळकत परिकर ठरावामध्ये नमूद दरानुसार व आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्यास समर्थ व सक्षम असल्याबाबतची विचारणा सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा व माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई यांना करण्यात यावी व त्यांनी असमर्थता दर्शविली तर या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी असे तत्कालीन मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निदेश दिले होते.

३.२ उपरोक्तप्रमाणे दिलेल्या निदेशानुसार, माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई व सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांच्या प्रतिनिधींशी समक्ष चर्चा करुन त्यांना अनुक्रमे दिनांक ०९.०३.२०१० आणि २१.०४.२०१० च्या पत्राद्वारे विचारणा करण्यात आली. माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई यांनी दिनांक १८.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये माजी सैनिकांची सुची पाठवून त्यातून नियुक्ती करावी असे सुचविले. सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे

जिल्हा यांनी दिनांक २९.०४.२०१० च्या पत्रान्वये बाब टिपणीच्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्यानुसार प्राधिकरणाच्या जमिनीची / मिळकतीच्या सुरक्षिततेची कोणतीही जबाबदारी घेण्यास, तसेच अतिक्रमण झाल्यास त्यांचे निष्कासन करणे, पुनर्वसन सदनिकांमध्ये घुसखोरी झाल्यास त्यांना बेदखल (Evict) करणे व त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविणे इत्यादी जबाबदारी घेण्यास तयार नाहीत. त्यांचेकडून फक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाईल. त्यावरील प्रशासकीय नियंत्रण संपूर्णपणे प्राधिकरणास करावे लागणार आहे. सुरक्षेच्या कामात कुचराई / हलगर्जीपणा झाल्यास कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद नाही. सुरक्षा मंडळाचे वेतन दर सुध्दा जास्त आहेत. सबब, प्राधिकरणाच्या निवेदेतील अटी व शर्तीची ते पूर्तता करत नाहीत व प्रामुख्याने जमिनीच्या / मिळकतीच्या सुरक्षेची कोणतीही जबाबदारी घेण्यास व त्यात कुचराई झाल्यास कोणतीही दंडात्मक कार्यवाहीची तरतूद ठेवण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली आहे. सबब, कार्यकारी समितीने २३०व्या बैठकीत पारीत केलेल्या ठराव क्र.११५४ ची अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव आहे.

३.३ कार्यकारी समितीने २३०व्या बैठकीत पारीत केलेला ठराव क्र.११५४ मध्ये एकूण चार सुरक्षा ठेकेदारांची नावे नमूद केली असून अनावधानाने मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स व सुरक्षा ठेकेदाराचे नांव नमूद करण्याचे राहून गेले आहे. सदरच्या सुरक्षा ठेकेदाराचे नाव ठरावात दाखल करण्याचा प्रस्ताव आहे.

३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पूढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र ११६४</u> :

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीने २३०व्या बैठकीतील पारीत केलेला ठराव क्र.११५४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार (१)मे.बॉम्बे इन्टेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि., (२) मे.ईगल सिक्युरिटी अँड पर्सनल सर्व्हिस, (३) मे.मॉडर्न व्ही.आर सिक्युरिटी फोर्स (इं) प्रा.लि., आणि (४) मे.सिंग इंन्टेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांचेसह (५) मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स अशा पाच सुरक्षा ठेकेदारांची रु.५,१००/- प्रति बंदुकधारी सुरक्षा रक्षक प्रतिमास आणि रु.४,८००/- प्रति मिळकत परिकर प्रतिमास या दराने (सर्व

..६/-

समावेशक दराने) प्राधिकरणाच्या मालमत्तेचे संरक्षण व व्यवस्थापन करण्याकरीता, सेवा पुरविण्याकरीता सदरच्या ठरावान्वये मान्यता दिल्यानुसार नेमणूकीच्या तारखेपासून तीन वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तींवर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : एकत्रित सहामाही व्यवस्थापन अहवाल (दोन) दिनांक १ ऑक्टोबर, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० व दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१०**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ ऑक्टोबर, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० व दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१० हया दोन एकत्रित सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.५(अ) : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१०.**

दिनांक १ ऑक्टोबर, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.५(ब) : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१०.**

दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुख्य जोडरस्त्यावरील एल.टी.रोड ते जोगळेकर नाला या भागाचे रुंदीकरण व सुधारीकरण या कामाच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, मुख्य जोडरस्त्यावरील एल्.टी.रोड ते जोगळेकर नाला या भागाचे काम करतेवेळी आवश्यकतेनुसार व स्थळ परिस्थितनुसार काही अतिरीक्त कामे करावी लागली. तसेच कामाच्या

व्यापामध्ये वाढ झाली. मुख्यत्त्वेकरुन पुढील ४ बाबींमुळे खर्चात वाढ झाली :-

अ) पावसाळी गटारे व मो-यांची कामे यांच्या काटछेदामध्ये वाढ झाली व अंदाजित काटछेदापेक्षा मोठे काटछेद महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करावे लागले.

ब) २००५, २००६ व २००७ या तिन्ही वर्षी पावसाळ्यापूर्वी गाळ काढण्याची कामे व त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा कंत्राटदाराला पुरवावी लागल्यामुळे अतिरिक्त खर्च झाला.

क) बृहन्मुंबई महानगरपालिकेने जलवाहिनीची कामे केल्यामुळे रेती व खडीच्या मिश्रणाचा भराव अतिरिक्त टाकावा लागला.

ड) कामाच्या कालावधीमध्ये झालेल्या भाववाढीच्या चढ उतारानुसार.

**६.२** या संदर्भात चर्चा करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी पुढील प्रश्न उपस्थित केला. प्रथमत: सल्लागारांनी अंदाजपत्रक तयार करताना महानगरपालिकेच्या नियमानुसार तरतूद (provisions) का केली नाही. त्यासाठी त्यांच्याकडून खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अतिरिक्त झालेल्या कामाची परिमाणे तपासणे आवश्यक आहे. यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, मुख्य अभियंता यांनी श्री.मिराणी यांना याबाबतचा तपशिल दाखविण्यात यावा.

**६.३** श्री.मिराणी, सदस्य यांनी पुढे असेही सांगितले की, पावसाळ्यापूर्वीचा गाळ काढण्याची कामे व रस्ता दुरुस्तीकरणाची कामे ही कंत्राटदारांची जबाबदारी असते. त्यामुळे त्यासाठी अतिरिक्त खर्च करणे आवश्यक आहे का, हे तपासण्यात यावे.

**६.४** श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे निदर्शनास आणले की, यापूर्वी झालेल्या अतिरिक्त खर्चाबाबत चर्चा करताना कोणत्या कारणामुळे सर्वसाधारणपणे खर्चात वाढ होते, याचा अभ्यास करावा व यापुढे अशा प्रकारची कामे करताना त्याची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घ्यावी.

**६.५** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र ११६५</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मुख्य जोडरस्ता (एल.टी.रोड ते जोगळेकर नाला पॅकेज-२) चे रुंदीकरण व सुधारीकरणाच्या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | स्विकृत निविदा रक्कम (रु.) | सुधारित अंदाजपत्रकीय किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १. | रिलायन्स मिशीगन (जे.व्ही.) | २१,१२,४७,७९९/- | २७,३६,४०,१०९/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP) मुख्य जोडरस्त्यावर पश्चिम रेल्वेच्या दहिसर-मिरा रोड स्थानकादरम्यान बांधण्यात येणा-या रेल्वे उड्डाणपूलाच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी कामामध्ये झालेल्या वाढीची प्रमुख कारणे थोडक्यात सांगितली ती पुढीलप्रमाणे :-

१) काम करताना पायाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाली तसेच काही ठिकाणी ओपन फाऊंडेशन ऐवजी पाईल फाऊंडेशन करणे भाग पडले.

२) पुलाच्या डेक स्लॅबची जाडी २०० मी.मी. ऐवजी २४० मी.मी. करण्यात आली.

३) कामाच्या लोखंडी सळयांच्या परिमाणामध्ये वाढ झाली.

४) पर्यावरण तसेच नगरविकास विभागाच्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार पुलाच्या दोन्ही बाजूस ध्वनीरोधक (Noise Barrior) बसविण्याची तरतूद करावी लागली.

५) काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मोठ्या क्रेन्सची तरतूद करावी लागली.

६) कामावर दरवाढ सुचकानुसार दरवाढ (escalation) द्यावी लागली.

७.२ याबाबत चर्चा करताना महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी विचारणा केली की, कामावर गर्डरचे काम करताना कशा प्रकारे काम करावे याची कार्यपध्दती नमूद करण्यात आली होती का, व तसे करण्यात आले असेल तर अतिरिक्त क्रेन्ससाठी जादा भाव देणे योग्य राहिल का, यावर उत्तर देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार काम केले असते तर कामाच्या प्रकल्पाच्या कालावधीमध्ये बरीच वाढ झाली असती. कारण रेल्वेमार्फत दररोज मध्यरात्री केवळ दोन तास एवढाच Block दिला जातो. त्यामुळे सदर कामास किमान ३ ते ४ महिन्यांचा कालावधी लागत असतो. त्या ऐवजी क्रेन लावल्यामुळे काम जून, २०१० मध्ये म्हणजे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करता आले. त्यामुळे एकूण काम पुष्कळच लवकर पूर्ण करता येणे शक्य झाले. या संदर्भात कार्यकारी समितीचे सदस्य श्री.एन.व्ही.मिराणी यांनी असे मत व्यक्त केले की, कंत्राटाच्या तरतूदींसह दोन क्रेनस उपलब्ध करण्याबाबतचा खुलासा करण्यात यावा. यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, कंत्राटाच्या तरतूदी तपासून पहाव्यात व या अतिरिक्त क्रेनचा खर्च देणे आवश्यक आहे का ते तपासून पहावे व कंत्राटदारांशी चर्चा करुन या अतिरिक्त क्रेनचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न करावा.

७.३ पुढे चर्चेच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असेही निदर्शित केले की, यापुढील अशा तरतुदींच्या पुलाची कामे करताना ध्वनीरोधकाची तरतूद अंदाजपत्रकामध्येच अंतर्भूत करण्यात यावी.

७.४ चर्चेअंती, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :--

ठराव क्र ११६६ :

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याव्दारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मुख्य जोडरस्त्यावर दहिसर-मिरारोड रेल्वे स्थानकाच्या दरम्यान बांधण्यात येणा-या रेल्वे उड्डाणपुलाच्या सुधारीत खर्चास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | स्विकृत निविदा रक्कम | सुधारीत अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स | रु.३९.०१ कोटी + भाव चढ उतार देय रक्कम | रु.५९.६७ कोटी |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणामार्फत इनोव्हेशन पार्क (Innovation Park) हा प्रकल्प सरकारी-खाजगी सहभाग (PPP) तत्वावर राबविण्याकरीता प्राधिकरणाच्या स्वारस्य अभिव्यक्तीस अनुसरुन मे.महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांना भागीदार म्हणून समाविष्ट करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत.**

८.१ या बाब टिप्पणीवर चर्चा करताना अति. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२५ व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशात अथवा त्याच्याजवळ सुमारे ५००० एकर जागेवर जागतिक दर्जाचे इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्याचे ठरविण्यात आले. तसेच सदर कामाची व्याप्ती, तिचा आराखडा व पार्क कार्यान्वित करण्यासाठीचा प्राथमिक कार्याची निश्चिती करणे इत्यादी कामाकरिता विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे यांची नेमणूक करण्यासही वरील बैठकीत मान्यता देण्यात आली.

८.२ सदर प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने व त्यासंबंधीत आवश्यक कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली व्हिजन ग्रुपची स्थापना करण्यात आली. व्हिजन ग्रुपच्या दिनांक २८ ऑगस्ट, २००९ रोजीच्या बैठकीत प्रस्तावित इनोव्हेशन पार्कचा विकास सरकारी खाजगी तत्वावर (PPP) करण्याचे व त्याकरीता स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्याचे ठरविले.

८.३ त्यानुसार दिनांक २ नोव्हेंबर, २००९ रोजी खालील अटींवर स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात आली.

१. आवेदनकर्त्याकडे नियोजित इनोव्हेशन पार्कसाठी आवश्यक असणा-या ५००० एकर जागेपैकी कमीतकमी ३०० एकर जागेची स्वमालकी/अथवा विकास करार असणे आवश्यक असून उर्वरीत जमीन पुढील २ वर्षात संपादित करणे आवश्यक आहे. सदर जमीन मुंबई महानगर प्रदेशात किंवा त्याच्या जवळ असणे आवश्यक आहे.

२. आवेदनकर्त्याचे संबंधीत क्षेत्रात रुपये ७५०/- कोटीचे निव्वळ मुल्य (net worth) असणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकल्पाची स्वबळावर (Standalone) अंमलबजावणी करणा-यास प्राधान्य देण्यात येणार असून आवेदनकर्ता जास्तीतजास्त दोन भागीदार घेऊन संयुक्त उद्यम (Joint Venture) बनवू शकतो.

३. आवेदनकर्त्याने व्यवसाय संकल्पना योजना (Conceptual Business Plan), प्राधिकरणासोबत इनोव्हेशन पार्कचा विकास करण्याबाबत माहिती, केंद्रस्थानी असणारी क्षेत्रे (Focus areas) व कालबध्द विकासाची योजना, इत्यादी सादर करणे आवश्यक आहे.

४. इनोव्हेशन पार्कचा सरकारी-खाजगी सहभाग (PPP) तत्वावर विकास करण्यात येणार असून त्यात मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचा भाग २६% पर्यंत निर्बंधित केला आहे.

८.४ सदर स्वारस्य अभिव्यक्तीस अनुसरुन प्राधिकरणास १० स्वारस्य अभिव्यक्ती/ प्रस्ताव प्राप्त झाले. प्राप्त स्वारस्य अभिव्यक्तींच्या मुल्यांकनासाठी अति.महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका "कोर ग्रुप" (Core Group) ची स्थापना करण्यात आली. सदर कोर ग्रुपच्या दि. १२ मार्च, २०१० रोजीच्या बैठकीत स्वारस्य अभिव्यक्तीच्या मुल्यांकनासाठी आवश्यक असणारे घटक (Parameter) निश्चित करुन त्यांचे तुलनात्मक मुल्यांक (weightages) निर्धारित करण्यात आले. दिनांक १४ मे, २०१० रोजीच्या कोर ग्रुपच्या बैठकीच्या मुल्यमापनानुसार मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांनी सादर केलेला प्रस्ताव मुल्यांकनानुसार प्रथम स्थानी असून हा प्रस्ताव स्वारस्य अभिव्यक्तीतील अटींशी पूर्णपणे सुसंगत असून सदर प्रस्ताव स्विकारण्यास योग्य आहे. मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांना सदर

..१२/-

इनोव्हेशन पार्कच्या विकास प्रक्रियेत भागीदार म्हणून समाविष्ट करण्याबाबतचा व सदर इनोव्हेशन पार्कसाठी मुंबई महानगर प्रदेशाजवळील जिल्हा-रायगड मधील प्रस्तावित स्थानांपैकी सुयोग्य स्थानाची निवड करण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सादर करण्यात आला होता व सदर प्रस्तावास त्यांनी मान्यता दिली आहे.

८.५ सदर प्रस्तावावर चर्चा करताना महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विचारणा केली की, इनोव्हेशन पार्क म्हणजे नक्की काय आहे व त्यात कोणत्या बाबींचा अंतर्भाव आहे.

८.६ यावर मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी इनोव्हेशन पार्क प्रकल्पांची पार्श्वभूमी विषद करताना असे सांगितले की, फ्रान्स मधील सोफिया ॲटीपोलिस येथील इनोव्हेशन पार्कच्या धर्तीवर सदर प्रकल्प आधारीत आहे. सोफिया ॲटीपोलिस येथे ५००० एकर पेक्षा जास्त जागेवर सुमारे ४० वर्षापूर्वी इनोव्हेशन पार्क स्थापित करण्यात आले. आज या पार्कमध्ये सुमारे २५००० शात्रज्ञ संशोधन करीत आहेत.

८.७ प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सोफिया ॲटीपोलिस येथे विशेषतः परफ्यूमरी, ऐरोस्पेस, वाईनरी इ. विषयांवर संशोधन चालते. या बाबींत प्रस्तावित इनोव्हेशन पार्क मध्ये आपल्या औद्योगिक गरजेनुसार संशोधनाचे विषय निश्चित करण्यात यावेत.

८.८ मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर प्रकल्प हा सरकारी-खाजगी सहभाग (PPP) वर विकसित करण्यात येत असून यात प्राधिकरणाचा भाग २६% पर्यंत मर्यादित आहे. सदर प्रकल्पाला लागणारी जमीन ही खाजगी कंपनी संकलन करणार आहे.

८.९ सदर जमिनीवर इनोव्हेशन पार्कचा विकास करण्याकरीता प्राधिकरण व जमीन मालक कंपनी मिळून एक संयुक्त कंपनी (SPV) स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी लागणा-या सरकारी परवानग्या इ. कामांसाठी प्राधिकरण सदर कंपनीस मदत करेल तसेच

पार्कच्या जमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा प्राधिकरणातर्फे पुरविण्यात येतील.

८.१० मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्पांबाबतचे सादरीकरण विज्ञान व तंत्रज्ञान पार्क, पुणे व मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांच्या मार्फत पुढील कार्यकारी समिती समोर आयोजित करण्यात यावे.

**प्रस्ताव :-**

८.११ वर उल्लेखित केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या दिनांक २ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या जाहिरातीतील स्वारस्य अभिव्यक्तीच्या प्रतिसादास अनुसरुन मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांच्यातर्फे मुंबई महानगर प्रदेश अथवा त्याच्या जवळ इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावास मान्यता द्यावी आणि मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांना सदर इनोव्हेशन पार्कच्या विकास प्रक्रियेत भागीदार म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता द्यावी.

८.१२ तसेच मेसर्स महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांनी उक्त प्रस्तावाद्वारे, सदर इनोव्हेशन पार्कसाठी मुंबई महानगर प्रदेशाजवळील जिल्हा-रायगड मधील प्रस्तावित स्थानांपैकी सुयोग्य स्थानाची निवड करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

८.१३ तसेच सदर इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्यासंदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

८.१४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११६७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या

..१४/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाच्या दिनांक २ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या जाहिरातीतील स्वारस्य अभिव्यक्तीच्या प्रतिसादास अनुसरुन मे.महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांच्यातर्फे मुंबई महानगर प्रदेश अथवा त्याच्या जवळ इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावास, तसेच मे.महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांना सदर इनोवहेशन पार्कच्या विकास प्रक्रियेत भागिदार म्हणून समाविष्ट करण्यास, कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे.महिंद्रा लाईफ स्पेसेस लिमिटेड यांनी उक्त प्रस्तावाद्वारे, सदर इनोव्हेशन पार्कसाठी मुंबई महानगर प्रदेशाजवळील जिल्हा रायगडमधील प्रस्तावित स्थानांपैकी सुयोग्य स्थानाची निवड करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास, कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्यासंदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही योग्य त्या फेरबदलासहित करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९(अ) : दिनांक ३०.०६.२०१० रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१० रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.९(ब) : दिनांक ३०.०९.२०१० रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१० रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

..१५/-

**<u>बाब क्र.१०</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिलन रेल्वे ओलांडणी पुलाच्या ६१ मी. लांबीच्या रेल्वे गाळयाचे बांधकाम करणे.</u>**

**१०.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी असे सांगितले की, मिलन रेल्वे ओलांडणी पुलाच्या मूळ कामामध्ये ४० मी. लांबीचा रेल्वेवरील गाळा Prestressed Concrete पध्दतीने प्रस्तावीत केलेला होता. परंतु रेल्वेला अंतिमतः तो ६१ मी. एवढा वाढविणे भाग पडले. यावर पुढे खुलासा करताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, सदर रेल्वे ओलांडणी पूल विमानतळाच्या air funnel मध्ये येत असल्यामुळे त्या ठिकाणी पश्चिम रेल्वेवरील दुस-या उन्नत corridor चे काम करता येणे शक्य नसल्यामुळे सदर ठिकाणी उन्नत corridor ऐवजी ground level ला अतिरिक्त रेल्वे lines टाकणे भाग पडले. त्यामुळे ६१ मी. लांबीचा रेल्वे गाळा बांधणे अपरिहार्य ठरले. एवढ्या मोठ्या लांबीचा पूल कॉक्रीटमध्ये बांधणे व्यवहार्य नसल्यामुळे त्या ठिकाणी स्टीलचा रेल्वे गाळा बांधणे भाग पडले. त्यामुळे सदर काम मूळ निविदांमधून काढून घेऊन त्यासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या व सदर कामासाठी सर्वात कमी देकाराचे मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांची निविदा मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

**१०.२** यावर चर्चा करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी असे मत मांडले की, या कामाचे अंदाजपत्रक व संकल्पाचा अन्य तज्ञांकडून अभ्यास करणे आवश्यक आहे. (Peer review) जेणेकरुन कामामध्ये खर्चाची बचत करणे शक्य आहे का हे तपासता येईल. तसेच कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी शिरीष पटेल असोसिएट्स यांच्यासारख्या तज्ञ सल्लागारांची नेमणूक करावी. तसेच पुढे चर्चा करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी अशीही विचारणा केली की, या कामासाठी तीन वेगवेगळ्या प्रकल्प व्यवस्थापक सल्लागारांची (PMC) नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे सल्लागारांच्या कामामध्ये duplication तर होत नाही ना, हे तपासणे आवश्यक आहे. यावर श्री.नंदर्गीकर,मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की,मूळ कामाचे सल्लागार मे.एस्.एन्. भोबे ॲण्ड असोसिएटस् यांच्या फी मधून स्टीलच्या कामासाठी फी वजा करण्यात आली आहे व स्टीलच्या कामाचे देखरेखीसाठी मे.इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंग (IRS) यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. त्यांच्याकडे स्टीलच्या कामाचा अतिशय विस्तृत असा अनुभव आहे व

..१६/-

स्कायवॉकच्या प्रकल्पामध्ये त्यांच्या अनुभवाचा खुपच फायदा झाला आहे. त्यामुळे दोघांच्याही कामाचा वाव हा वेगळा असून त्यामध्ये duplication होत नाही या शिवाय रेल्वेच्या नियमानुसार रेल्वेतर्फे मे.राईटस् यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे व त्यांच्या कामाचा वाव रेल्वे नियमानुसार स्वतंत्र आहे. श्री.मिराणी यांनी शेवटी असे सूचित केले की, तीनही सल्लागारांच्या कामाचा वावाच्या (Terms of References) प्रती त्यांच्या माहितीसाठी त्यांच्याकडे देण्यात याव्यात.

**१०.३** चर्चेच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी विचारणा केली की, या कामाची सुधारित किंमत किती आहे. त्यामुळे मूळ कामाच्या किंमतीमध्ये किती वाढ झाली यावर खुलासा करावा. श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, मूळ कामाची किंमत रु.४१.५० कोटी एवढी होती. परंतु त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मूळ रस्त्यावरील drainage व water supply line ची अतिरिक्त कामे करण्याची अट घातल्यामुळे तसेच अन्य संकीर्ण कामांमुळे सुमारे रु.६.०७ कोटी एवढी वाढ झाली. तसेच प्रत्यक्ष रेल्वेवरील स्टीलच्या मुख्य गाळ्याचे काम करण्यासाठी स्टीलचे ३ अतिरिक्त गाळे पोचमार्गावर करणे भाग पडले. कारण अस्तित्त्वातील दाट वस्ती व रस्त्यांचा विचार करता रेल्वेवरील गाळा पश्चिम बाजूकडून पूर्वेकडे लॉंच करावा लागणार आहे. या सर्वांमुळे कामाची एकूण किंमत रुपये ८०.९० कोटी एवढी झाली. मूळ कामामध्ये एकूण रुपये ८.९१ कोटी एवढा rebate घेण्यात येणार आहे.

**१०.४** महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी विचारणा केली की, कामाचे दर स्पर्धात्मक आहेत काय, यावर श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, या कामाच्या एकूण ५ निविदांची विक्री करण्यात आली असून, तीन अनुभवी कंत्राटदारांकडून दर प्राप्त झाले. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी निविदा अंदाजपत्रकापेक्षा ३७.९९% इतकी जास्त होती. परंतु वाटाघाटीनंतर ती २८% एवढी कमी करण्यात आली व ती योग्य आहे.

१०.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.

<u>**ठराव क्र.११६८**</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत, मिलन रेल्वे ओलांडणी पुलाच्या ६१ मी. लांबीच्या रेल्वे गाळयाचे बांधकाम करणे या कामासाठी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% जास्त दराची म्हणजे रु. ४२.२४ कोटी रक्कमेची लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे.एस्.एन. भोबे यांची संपूर्ण प्रकल्पाकरिता "समंत्रक" म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देत आहे. तसेच मे.एस्.एन. भोबे यांचे समंत्रक सेवेचे दर निविदा किंमतीच्या १.२५% + सेवा कर स्वीकृत करण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर कामी मे.आय्.आर.एस्. यांची Third Party Quality Auditor म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पातील स्ट्रक्चरल स्टील फॅब्रिकेशनचे तपासणी कामी प्रती पाहणी त्यांची फी रु.६,५००/- + सेवा कर या दरानुसार एकूण फी म्हणून देय होणा-या रकमेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** रेल्वे विभागाच्या निर्देशानुसार मे.राईटस् यांची रेल्वे विभागातर्फे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांचे फी पोटी स्ट्रक्चरल स्टील फॅब्रिकेशनचे तपासणीकरिता एकूण रक्कम रु.३२ लाख व इतर पूर्ण कामाच्या पहाणीकरिता रु.१० लाख प्रतिमाह + सेवा कर प्रचलित दरानुसार असे स्वीकृत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

..१८/-

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.११ :</u>** **<u>वडाळा भारवाहक तळ भाग-I येथील अंतर्गत रस्त्यांचे टप्पा-III च्या कॉंक्रिटीकरण कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

**११.१** सदर बाब टिपणीतील प्रस्तावाबद्दल माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ आणि आंतरराज्यीय बस स्थानक उभारणीकरीता डिसेंबर, २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०चे उपकलम (३) चे पोटकलम (ड) अंतर्गत प्राधिकरणाने सखोल विश्लेषण करुन विशेष प्राधिकरण हद्दीकरिता नियोजन प्रस्तावाचा मसुदा तयार करुन घेतला होता. सदर मसुदा प्रस्तावास प्राधिकरणाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे सदर मसुदा प्रस्ताव नागरिकांच्या सूचना व हरकतींसाठी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**११.२** महाराष्ट्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीने दिनांक ५ जून, २०१० रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २५व्या बैठकीत वडाळा भारवाहक क्षेत्राचा, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांप्रमाणे विकास करावा असे निर्देश दिले आहेत. तद्नंतर प्राधिकरणाने अंतिमरुप देऊन सादर केलेल्या नियोजन प्रस्तावास दिनांक १६ नोव्हेबर, २०१० रोजी राज्य शासनाने मंजूरी दिलेली आहे.

**११.३** वडाळा भारवाहक तळ भाग-I मधील अंतर्गत रस्त्यांची लांबी एकूण ५.२७३ कि.मी. आहे. अंतर्गत रस्त्यांचे त्यांच्या निकडीनुसार व काम नियोजनबध्द पध्दतीने करण्याच्या

दृष्टीने कामाचे विभाजन टप्पा-I, टप्पा-II, टप्पा-III व टप्पा-IV मध्ये केले गेले व त्यानुसार सध्या टप्पा-I (रस्त्यांची लांबी-१.२९२ कि.मी.) व टप्पा-II (रस्त्यांची लांबी १.६७३ कि.मी) मधील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. रस्त्यांचे काँक्रीटीकरणाद्वारे मजबूतीकरणाच्या प्रस्तावाअंतर्गत टप्पा-III मध्ये ०.८५८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करावयाचे आहे. अंतर्गत रस्त्यांच्या टप्पा-III मधील कॉक्रीटीकरण करण्याच्या कामास मा. महानगर आयुक्त यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

११.४ वडाळा भारवाहक तळ येथील रस्ते जागतिक दर्जाचे करण्याच्या दृष्टीने हे रस्ते काँक्रीटीकरणाद्वारे मजबूत करण्याच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) मे.स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांची नेमणूक दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ रोजी करण्यात आली. सदर मजबुतीकरणाच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी योग्य त्या चाचण्या घेऊन, पृष्ठभागाखालील भूस्तराचे सविस्तर अभ्यास व वाहतुकीचे सर्वेक्षण करुन (IRC च्या मानकाप्रमाणे) रस्त्याचा अंतिम आराखडा तयार केलेला आहे. वडाळा भारवाहक तळाचा विकास खाडीजमिनीवर भरणी करुन केलेला असल्याने जमीन सुधारणेसाठी स्टोन कॉलम करण्याची शिफारस केलेली आहे. सदर रस्त्यांचा आराखडा हा भारतीय प्राद्योगिकी संस्था, मुंबई (I.I.T.) यांच्याकडून कच्च्या मुद्रीताची (proof check) तपासणी करण्यात आलेली आहे. सदर कामासाठीचे अंदाजपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे सन २००९-१० चे दरपत्रक व काही दरांचे पृथःक्करण करुन तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकानुसार किंमत रु.३७,१६,५२,९००/- एवढी आहे.

११.५ सदर प्रस्तावाअंतर्गत टप्पा-III मध्ये अंतर्गत ट्रक रस्ते, कार रस्ते यांचे त्यांच्या मंजूर आराखडयाप्रमाणे रुंदीच्या उपलब्धतेप्रमाणे काँक्रीटीकरण करावयाचे आहे. रस्त्याच्या बाजूस पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे, रस्त्याच्या कडेला समांतर पायाभूत सुविधांसाठींची मार्गिका (Utility Duct), जलवाहिन्या, मलनिःस्सारण वाहिन्या, रस्त्यावरील दिवाबत्ती, इत्यादी कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शे-याप्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

**११.६** सदर कामासाठीच्या पूर्व अर्हतेसाठी सूचना दिनांक ६ ऑगस्ट, २०१० रोजी 'इंडियन एक्सप्रेस', 'लोकसत्ता' या दैनिक वृत्तपत्रांत प्रसिध्द केली होती. सदर कामासाठी योग्य निविदाकारांनी निविदा सादर करावी या उद्देशासाठी पूर्व अर्हतेसाठीच्या सूचनेत आवश्यक त्या पात्रतेच्या अटी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. त्यानुसार इच्छुक निविदाकारांची वार्षिक उलाढाल, समप्रकारच्या कामांचा पूर्वानुभव, काँक्रीट रस्ते (एम-४० ग्रेड स्लिपफॉर्म पेव्हरसह), स्टोन कॉलम यांचे काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र, स्व:मालकीचा स्लीपफॉर्म पेव्हर असल्याबाबतचे प्रमाणपत्र, स्व:मालकीचा बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत काँक्रीट प्लँट असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे, इत्यादी शर्ती नमूद करण्यात आल्या होत्या. पूर्व अर्हतेसाठीचे कोरे संच एकूण २० निविदाकारांनी खरेदी केले. संबंधित प्रमाणपत्राचे सिल बंद लखोटे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजीच्या दुपारी १ वाजेपर्यंत सादर करावयाचे होते. एकूण १५ निविदाकारांनी सिल बंद लखोटे सादर केले.

**११.७** अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर कागदपत्रांची छाननी करुन एकूण ४ निविदाकारांना वरील कामाकरिता पात्र ठरविले. दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी सदर कामासाठी आर्थिक देकार या पूर्व अर्हतेमध्ये पात्र झालेल्या निविदाकारांकडून मागविण्यात आले. हे काम पूर्ण करावयाचा कालावधी १६ महिने (पावसाळयासहित) इतका आहे. या देकारामध्ये मे. महाविर रोड्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची (+) १४.८५% इतक्या दराची निविदा लघुत्तम आहे. सदर लघुत्तम निविदाच्या समर्थनार्थ मे. महाविर रोड्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. तसेच मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांना त्या निविदेचे सखोल विश्लेषण करण्याबद्दल सांगण्यात आले. मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांनी सदर विश्लेषणात असे नमूद केले की, अंदाजपत्रक बनविण्यात आल्यापासून सिलबंद निविदा सादर करण्याच्या वेळेपर्यंत मनुष्यबळ, इंधन यांच्या मूळ निर्देशांकात झालेली वाढ, त्यामुळे दैनंदिन यांत्रिक व मनुष्य खर्चात वाढ होणे, खोदकामातून निघालेली माती जास्त अंतरावर टाकावी लागणे तसेच मा. उच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बंधामुळे कामासाठी लागणा-या वाळूच्या उपलब्धतेत घट होऊन किंमतीत अचानक मोठी भाववाढ होणे इ. विविध कारणांमुळे प्रकल्पाचे काम करण्याच्या मूळ खर्चात बरीच वाढ झालेली आहे. या वाढीचा अंतर्भाव अंदाजपत्रक बनवितेवेळी वापरलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका /

सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दरपत्रकात समाविष्ट नसून सदर कारणामुळे झालेल्या वाढीचा एकत्रित परिणाम दरपत्रकापेक्षा कमीतकमी ९.६८% इतका जास्त आहे.

**११.८** सदर निविदा मंजूर करण्याकरिता प्राधिकरणाने महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यांकन समितीची स्थापना केलेली आहे. सदर समितीत मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अंतर्भाव आहे. लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला देकार हा जास्त असल्याचे दिसून आल्याने निविदाकाराबरोबर २ वेळा चर्चा करून कमी दराने काम करण्याबाबतची विचारणा करण्यात आली. त्यानुसार मे.महाविर रोड्स ॲण्ड इन्फ्रास्टक्चर प्रा. लि. यांनी टप्पा III मधील कामाकरिता त्यांचा दर २ टप्प्यात (१.५% व १.६५%) ने कमी करुन नवीन सुधारित दर (+) ११.७०% इतक्या दराने करण्याचे मान्य केले.

**११.९** सदर मूल्यांकन समितीच्या बैठकीत महाराष्ट्र शासनाने नुकत्याच मंजूर केलेल्या वडाळा भारवाहक तळाच्या विकासावर चर्चा केली. त्यानुसार प्रस्तावित वाणिज्यिक विकास केंद्राचा विचार करता त्या शेजारी ट्रक वाहनतळाचा (Idle Parking) समावेश या कामाच्या व्याप्तीतून रद्द करुन उर्वरित काम पूर्ण करण्याचे ठरविले. या बदलामुळे कामाची अंदाजपत्रकीय किंमत सुमारे ३०% पर्यंत कमी होत आहे. वरील प्रस्तावित वाणिज्य केंद्राचा विचार करता सदर कामाचे सखोल तांत्रिक विश्लेषण करुन त्या अनुषंगाने कमी होणा-या कामाच्या व्याप्तीमुळे होणा-या संभाव्य आर्थिक बदलास महानगर आयुक्त यांची मान्यता घेण्यात येईल व सदर बाबींची नोंद ही कंत्राटदाराला देण्यात येणा-या निविदा स्विकृती व कार्यारंभाचा आदेश यामध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे, असे प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले.

**११.१०** सदर प्रस्तावावर चर्चा करताना महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, सर्वसाधारणपणे निविदाकारांबरोबर चर्चा करुन त्यांच्याकडून भाव कमी करण्यास सांगणे हे अयोग्य असून शक्यतोवर टाळण्यात यावे. त्यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाची अशी पद्धत निविदाकारांना जास्त किंमतीची निविदा सादर करण्यास उद्युक्त करते. म्हणून जागतिक बँक किंवा इतर आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यामध्ये सदर पद्धतींचा उपयोग टाळला जातो.

**११.११** सदर सूचनेवर मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे करण्यात येणा-या कामाचा आवाका व किंमत ही खूप मोठी असल्याने चर्चेद्वारे ती १% किंमत जरी कमी झाली तरी खूप मोठी बचत होते.

**११.१२** प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसूची प्रसिद्ध होण्याची वेळ व निविदा मागविणे यामध्ये सर्वसाधारणपणे ९ ते १२ महिन्यांचा कालावधी असल्याने दरसूची व बाजारभाव यामध्ये नेहमीच तफावत असते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचित साधारणतः १०% ओव्हरहेडचा समावेश असतो. अंदाजपत्रके तयार करताना प्राधिकरण सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महानगरपालिकेच्या दरपत्रकाचा उपयोग करीत असल्याने सदर ओव्हरहेड १०% पर्यंतच मर्यादित राहतात.

**११.१३** सबब, प्राधिकरणास प्राप्त झालेल्या निविदांचे सखोल मूल्यांकन करताना वरील बाबी लक्षात घेता अंदाजपत्रकातील दरांपेक्षा जास्त दर आल्याचे दिसून आल्यास प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार कंत्राटदाराकडून त्याने सादर केलेल्या दरांबाबतचे स्पष्टीकरण व ते कसे बरोबर आहेत याबाबत (Justification) विचारणा करण्यात येते. सदर दर अंदाजपत्रकापेक्षा जास्त आढळल्यास निविदाकारास त्यांचे दर कमी करण्याबाबत चर्चा करण्यात येते.

**११.१४** मा. मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करणे व निविदा स्विकृतीच्या पद्धतीबाबत या आधीही कार्यकारी समितीच्या बैठकीत सखोल चर्चा झाली असून त्यात असे ठरले होते की, प्राधिकरणातील प्रचलित पद्धत योग्य असून ती पुढे सुरु ठेवण्यात यावी.

**११.१५** मा. मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे करण्यात येणारी कामे कमी झाली आहेत. तसेच नागरी पायाभूत सुविधा (City Level Infrastructure) या पुढे प्राधिकरणामार्फत पुरविण्यात न येण्याबाबत धोरणात्मक निर्णय प्राधिकरणाने याआधीच घेतला आहे.

**११.१६** श्री.मिराणी, सदस्य यांनी अशी विचारणा केली की, कंत्राटदारांच्या मूल्यांकन समितीत बाहेरील तटस्थ सदस्याचा अंतर्भाव होता किंवा कसे? यावर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे स्पष्ट केले की, या मूल्यांकन समितीत मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अंतर्भाव केलेला आहे व सदर मूल्यांकन समितीचा अहवाल बाब टिप्पणी म्हणून सादर करण्यात आलेला आहे. तसेच या संदर्भात श्री.मिराणी, सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, गुणनियंत्रण लेखा परिक्षक यांची यासोबतच नियुक्ती करण्यात यावी.

**११.१७** त्यानंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११६९** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियिम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळ भाग-I येथील अंतर्गत रस्त्यांच्या टप्पा-III मधील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्याप्रमाणे निविदाकाराची न्युनतम निविदा व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह स्विकारण्यास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) | लघुत्तम निविदाकाराचे नाव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वडाळा भारवाहक तळ येथील अंतर्गत रस्त्यांचे भाग-I मधील टप्पा-III चे कॉंक्रीटीकरण करणे. | ३७,१६,५२,९००/- | मे. महाविर रोड्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | (+) ११.७०% अधिक दराने | ४१,५१,३६,२८९/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१२ :</u>** **<u>वडाळा भारवाहक तळ भाग-I येथील अंतर्गत रस्त्यांचे टप्पा-IV चे कॉंक्रिटीकरण करण्याचे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

१२.१ सदर बाब टिपणीतील प्रस्तावाबद्दल माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ आणि आंतरराज्यीय बस स्थानक उभारणीकरीता डिसेंबर, २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०चे उपकलम (३) चे पोटकलम (ड) अंतर्गत प्राधिकरणाने सखोल विश्लेषण करुन विशेष प्राधिकरण हद्दीकरिता नियोजन प्रस्तावाचा मसुदा तयार करुन घेतला होता. सदर मसुदा प्रस्तावास प्राधिकरणाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे सदर मसुदा प्रस्ताव नागरिकांच्या सूचना व हरकतींसाठी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

१२.२ महाराष्ट्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीने दिनांक ५ जून, २०१० रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २५व्या बैठकीत वडाळा भारवाहक क्षेत्राचा, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांप्रमाणे विकास करावा असे निर्देश दिले आहेत. तद्नंतर प्राधिकरणाने अंतिमरुप देऊन सादर केलेल्या नियोजन प्रस्तावास दिनांक १६ नोव्हेंबर, २०१० रोजी राज्य शासनाने मंजूरी दिलेली आहे.

१२.३ वडाळा भारवाहक तळ भाग-I मधील अंतर्गत रस्त्यांची लांबी एकूण ५.२७३ कि.मी. आहे. अंतर्गत रस्त्यांचे त्यांच्या निकडीनुसार व काम नियोजनबध्द पध्दतीने करण्याच्या दृष्टीने कामाचे विभाजन टप्पा-I, टप्पा-II, टप्पा-III व टप्पा-IV मध्ये केले गेले व त्यानुसार सध्या टप्पा-I (रस्त्यांची लांबी-१.२९२ कि.मी.) व टप्पा-II (रस्त्यांची लांबी १.६७३ कि.मी) मधील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाद्वारे मजबूतीकरणाच्या

..२५/-

प्रस्तावाअंतर्गत टप्पा-IV मध्ये १.४५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करावयाचे आहे. अंतर्गत रस्त्यांच्या टप्पा-IV मधील कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामास मा. महानगर आयुक्त यांनी दि.२ ऑगस्ट, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

**१२.४** वडाळा भारवाहक तळ येथील रस्ते जागतिक दर्जाचे करण्याच्या दृष्टीने हे रस्ते कॉंक्रीटीकरणाद्वारे मजबूत करण्याच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांची नेमणूक दि. ३ ऑक्टोबर, २००७ रोजी करण्यात आली. सदर मजबुतीकरणाच्या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी योग्य त्या चाचण्या घेऊन, पृष्ठभागाखालील भूस्तराचे सविस्तर अभ्यास व वाहतुकीचे सर्वेक्षण करुन (IRC च्या मानकाप्रमाणे) रस्त्याचा अंतिम आराखडा तयार केलेला आहे. वडाळा भारवाहक तळाचा विकास खाडीजमिनीवर भरणी करुन केलेला असल्याने जमीन सुधारणेसाठी स्टोन कॉलम करण्याची शिफारस केलेली आहे. सदर रस्त्यांचा आराखडा हा भारतीय प्राद्योगिकी संस्था, मुंबई (I.I.T.) यांच्याकडून कच्च्या मुद्रीताची (proof check) तपासणी करण्यात आलेली आहे. सदर कामासाठीचे अंदाजपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे सन २००९-१० चे दरपत्रक व काही दरांचे पृथःक्करण करुन तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकानुसार किंमत रु. ४१,००,०३,५१०/- एवढी आहे.

**१२.५** सदर प्रस्तावाअंतर्गत टप्पा-IV मध्ये अंतर्गत ट्रक रस्ते, कार रस्ते यांचे त्यांच्या मंजूर आराखड्याप्रमाणे रुंदीच्या उपलब्धतेप्रमाणे कॉंक्रीटीकरण करावयाचे आहे. रस्त्याच्या बाजूस पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे, रस्त्याच्या कडेला समांतर पायाभूत सुविधांसाठींची मार्गिका (Utility Duct), जलवाहिन्या, मलनिःस्सारण वाहिन्या, रस्त्यावरील दिवाबत्ती, इत्यादी कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शे-याप्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

**१२.६** सदर कामासाठीच्या पूर्व अर्हतेसाठी सूचना दि. ६ ऑगस्ट, २०१० रोजी 'इंडियन एक्सप्रेस', 'लोकसत्ता' या दैनिक वृत्तपत्रांत प्रसिध्द केली होती. सदर कामासाठी योग्य निविदाकारांनी निविदा सादर करावी या उद्देशासाठी पूर्व अर्हतेसाठीच्या सूचनेत आवश्यक त्या पात्रतेच्या अटी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. त्यानुसार इच्छुक निविदाकारांची वार्षिक उलाढाल, समप्रकारच्या कामांचा पूर्वानुभव, कॉंक्रीट रस्ते (एम-४० ग्रेड स्लिपफॉर्म पेव्हरसह), स्टोन कॉलम

..२६/-

यांचे काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र, स्वःमालकीचा स्लीपफॉर्म पेव्हर असल्याबाबतचे प्रमाणपत्र, स्वःमालकीचा बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत कॉंक्रीट प्लँट असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे, इत्यादी शर्ती नमूद करण्यात आल्या होत्या. पूर्व अर्हतेसाठीचे कोरे संच एकूण २० निविदाकारांनी खरेदी केले. संबंधित प्रमाणपत्राचे सिल बंद लखोटे दि. ३१ ऑगस्ट, २०१० रोजीच्या दुपारी १ वाजेपर्यंत सादर करावयाचे होते. एकूण १५ निविदाकारांनी सिल बंद लखोटे सादर केले.

१२.७ अति.महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर कागदपत्रांची छाननी करुन एकूण ४ निविदाकारांना वरील कामाकरिता पात्र ठरविले. दि. २३ सप्टेंबर, २०१० रोजी सदर कामासाठी आर्थिक देकार या पूर्व अर्हतेमध्ये पात्र झालेल्या निविदाकारांकडून मागविण्यात आले. हे काम पूर्ण करावयाचा कालावधी १६ महिने (पावसाळयासहित) इतका आहे. या देकारामध्ये मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांची (+) १३.९५% इतक्या दराची निविदा लघुत्तम आहे. सदर लघुत्तम निविदाच्या समर्थनार्थ मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. तसेच मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांना त्या निविदेचे सखोल विश्लेषण करण्याबद्दल सांगण्यात आले. मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. यांनी सदर विश्लेषणात असे नमूद केले की, अंदाजपत्रक बनविण्यात आल्यापासून सिलबंद निविदा सादर करण्याच्या वेळेपर्यंत मनुष्यबळ, इंधन यांच्या मूळ निर्देशांकात झालेली वाढ, त्यामुळे दैनंदिन यांत्रिक व मनुष्य खर्चात वाढ होणे, खोदकामातून निघालेली माती जास्त अंतरावर टाकावी लागणे तसेच मा. उच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बंधामुळे कामासाठी लागणा-या वाळूच्या उपलब्धतेत घट होऊन किंमतीत अचानक मोठी भाववाढ होणे इ. विविध कारणांमुळे प्रकल्पाचे काम करण्याच्या मूळ खर्चात बरीच वाढ झालेली आहे. या वाढीचा अंतर्भाव अंदाजपत्रक बनवितेवेळी वापरलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका/सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दरपत्रकात समाविष्ट नसून सदर कारणामुळे झालेल्या वाढीचा एकत्रित परिणाम दरपत्रकापेक्षा कमीतकमी ९.६८% इतका जास्त आहे.

१२.८ सदर निविदा मंजूर करण्याकरिता प्राधिकरणाने महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यांकन समितीची स्थापना केलेली आहे. सदर समितीत मुख्य अभियंता (विशेष

प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अंतर्भाव आहे. लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला देकार हा जास्त असल्याचे दिसून आल्याने निविदाकाराबरोबर २ वेळा चर्चा करून कमी दराने काम करण्याबाबतची विचारणा करण्यात आली. त्यानुसार मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांनी टप्पा-IV मधील कामाकरिता त्यांचा दर २ टप्प्यात (१.२६% व १%) ने कमी करुन नवीन सुधारित दर (+) ११.६९% इतक्या दराने करण्याचे मान्य केले.

**१२.९** सदर प्रस्तावावर चर्चा करताना महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, सर्वसाधारणपणे निविदाकारांबरोबर चर्चा करुन त्यांच्याकडून भाव कमी करण्यास सांगणे हे अयोग्य असून शक्यतोवर टाळण्यात यावे. त्यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाची अशी पद्धत निविदाकारांना जास्त किंमतीची निविदा सादर करण्यास उद्युक्त करते. म्हणून जागतिक बँक किंवा इतर आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यामध्ये सदर पद्धतींचा उपयोग टाळला जातो.

**१२.१०** सदर सूचनेवर मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे करण्यात येणा-या कामाचा आवाका व किंमत ही खूप मोठी असल्याने चर्चेद्वारे ती १% किंमत जरी कमी झाली तरी खूप मोठी बचत होते.

**१२.११** प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसूची प्रसिद्ध होण्याची वेळ व निविदा मागविणे यामध्ये सर्वसाधारणपणे ९ ते १२ महिन्यांचा कालावधी असल्याने दरसूची व बाजारभाव यामध्ये नेहमीच तफावत असते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर सूचित साधारणतः १०% ओव्हरहेडचा समावेश असतो. अंदाजपत्रके तयार करताना प्राधिकरण सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महानगरपालिकेच्या दरपत्रकाचा उपयोग करीत असल्याने सदर ओव्हरहेड १०% पर्यंतच मर्यादित राहतात.

**१२.१२** सबब, प्राधिकरणास प्राप्त झालेल्या निविदांचे सखोल मूल्यांकन करताना वरील बाबी लक्षात घेता अंदाजपत्रकातील दरांपेक्षा जास्त दर आल्याचे दिसून आल्यास प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार कंत्राटदाराकडून त्याने सादर केलेल्या दरांबाबतचे स्पष्टीकरण व ते कसे

बरोबर आहेत याबाबत (Justification) विचारणा करण्यात येते. सदर दर अंदाजपत्रकापेक्षा जास्त आढळल्यास निविदाकारास त्यांचे दर कमी करण्याबाबत चर्चा करण्यात येते.

**१२.१३** मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करणे व निविदा स्विकृतीच्या पद्धतीबाबत या आधीही कार्यकारी समितीच्या बैठकीत सखोल चर्चा झाली असून त्यात असे ठरले होते की, प्राधिकरणातील प्रचलित पद्धत योग्य असून ती पुढे सुरु ठेवण्यात यावी.

**१२.१४** मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे करण्यात येणारी कामे कमी झाली आहेत. तसेच नागरी पायाभूत सुविधा (City Level Infrastructure) या पुढे प्राधिकरणामार्फत पुरविण्यात न येण्याबाबत धोरणात्मक निर्णय प्राधिकरणाने याआधीच घेतला आहे.

**१२.१५** श्री.मिराणी, सदस्य यांनी अशी विचारणा केली की, कंत्राटदारांच्या मूल्यांकन समितीत बाहेरील तटस्थ सदस्याचा अंतर्भाव होता किंवा कसे? यावर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे स्पष्ट केले की, या मूल्यांकन समितीत मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अंतर्भाव केलेला आहे व सदर मूल्यांकन समितीचा अहवाल बाब टिप्पणी म्हणून सादर करण्यात आलेला आहे. तसेच या संदर्भात श्री.मिराणी, सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, गुणनियंत्रण लेखा परिक्षक यांची यासोबतच नियुक्ती करण्यात यावी.

**१२.१६** त्यानंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.११७०</u>** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर

करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळ भाग-I येथील अंतर्गत रस्त्याच्या टप्पा-IV मधील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या निविदाकाराची न्युनतम निविदा व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह स्विकारण्यास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) | लघुत्तम निविदाकाराचे नाव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वडाळा भारवाहक तळ येथील अंतर्गत रस्त्यांचे भाग-I मधील टप्पा-IV चे कॉंक्रीटीकरण करणे. | ४१,००,०३,५१०/- | मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | (+)११.६९% अधिक दराने | ४५,७९,३२,९२०/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.१३ : पूर्व द्रुतगती महामार्गावरील सात पादचारी पुलांच्या बांधकामाच्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, पूर्व द्रूतगती महामार्गावरील ७ पादचारी पुलांच्या कामामध्ये पुढील कारणामुळे खर्चामध्ये वाढ झालेली आहे.

१) पुलाची रुंदी तीन मीटर ऐवजी साडेतीन मीटर करण्यासाठी मा.पालक मंत्री, मुंबई उपनगर यांनी आग्रह धरल्यामुळे रुंदी वाढविण्यात आली.

२) भाववाढीमुळे (escalation) द्याव्या लागणा-या रकमेमध्ये वाढ झाली.

३) पायाच्या कामामध्ये खडकाची पातळी अंदाजपत्रकीय पातळीपेक्षा जादा झाल्यामुळे पायाच्या कामामध्ये वाढ झाली. त्यामुळे एकूण रु.३.१३ कोटी म्हणजेच ३२.१४% एवढी वाढ झाली. परंतु त्यापैकी १३.०३% भाववाढ झाल्यामुळे प्रत्यक्ष वाढ २०% हून कमीच निदर्शनास येते.

१३.२ या प्रस्तावाबाबत चर्चा करताना श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, पूर्व नियोजित ३ मी. पेक्षा जादा रुंदीचे काम करणे आवश्यक होते का व सर्वसाधारणपणे अन्यत्र पुलाची रुंदी किती ठेवण्यात आली, यावर उत्तर देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, अन्यत्र पुलांची रुंदी ३ मीटरच ठेवण्यात येते. रस्त्यालगतची होणारी भविष्यातील वाढ लक्षात घेता सदर रस्त्याची रुंदी जादा ठेवण्यात आली आहे. परंतु पुढे त्यांनी असेही सांगितले की, या जादा वाढीमुळे सदर रुंदी अन्य पुलाच्या तुलनेत थोडी जास्त असली तरी भविष्यातील पूर्व द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही भागामध्ये सर्वसाधारण वाढ लक्षात घेता सदर जादा रुंदी ठेवण्यात आली आहे. श्री.मिराणी, सदस्य यांनी याबाबत अशी विचारणा केली की, या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी कार्यकारी समिती सक्षम आहे का, याबाबत उत्तर देताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, मूळ प्रशासकीय मान्यतेनंतर एकूण प्रशासकीय मान्यता किंमतीच्या अधिन राहून Individual (ठराविक) कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत.

१३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र.११७१</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील सात पादचारी पुलांच्या बांधकामाच्या रु.३.१३ कोटी एवढया वाढीव खर्चास मान्यता प्रदान करुन कामाची सुधारीत किमंत रु. १२.८५ कोटी करीता सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ :** **धारावी येथील नगर भू.क्र.५३१ या भूखंडावर बांधण्यात येत असलेल्या क्रिडा संकुलाच्या कामाकरीता नेमणूक केलेल्या टेकेदारास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास मुदतवाढ व प्रकल्पाच्या वाढीव कामांमुळे मंजूर निविदेवरील अतिरिक्त खर्चास मान्यता देणेबाबत.**

**१४.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, सदर क्रिडा संकुलामध्ये मूळ क्षेत्रफळ ५४७४ चौ.मी. एवढे होते व त्यामध्ये श्री.एकनाथ गायकवाड, मा.खासदार व श्रीमती वर्षा गायकवाड मा.मंत्री तसेच अन्य स्थानिक लोक प्रतिनिधींच्या मागण्यांनुसार दोन अतिरिक्त मजल्यांची तरतूद केल्यामुळे क्षेत्रफळामध्ये सुमारे ३९% एवढी वाढ झाली. तसेच या भागातील सदर क्रिडा संकुल हे अतिशय महत्त्वाचे व एकमेव असल्यामुळे सुशोभिकरणासाठी, Rain Water harvesting व सौंदर्यीकरणासाठी काही अतिरिक्त कामाचा अंतर्भाव करण्यात आला. त्यामुळे सुमारे १.७८ कोटी एवढा जादा खर्च होण्याचे अपेक्षित आहे. या सर्व गोष्टींमुळे कामामध्ये एकूण ७.६६ कोटी म्हणजेच ७९.२२% एवढी वाढ झालेली आहे.

**१४.२** या प्रस्तावाबाबत चर्चा करताना श्री.सुकथनकर, सदस्य यांनी विचारणा केली की, काम सुरु झाल्यानंतर घटकांच्या specifications मध्ये बदल करणे योग्य नाही. त्यांनी तरण तलावासाठीच्या लागणा-या flooring बाबत विचारणा केली. यावर मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या कामामध्ये सुरुवातीला जे सल्लागार नेमलेले होते त्यांचा performance योग्य नसल्यामुळे त्यांच्या ऐवजी नवीन सल्लागार नेमण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या त्रुटींमध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटले. त्यासाठी सदर flooring ची तरतूद केल्याचे दिसते. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी याबाबत असे मत दिले की, अंदाजपत्रकीय तरतूद केल्यानंतर व निविदा मागविण्यात आल्यानंतर कोणत्याही बाबींमध्ये यापुढे सर्वसाधारणपणे बदल करण्यात येऊ नयेत.

**१४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.

**ठराव क्र.११७२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती पुढील कामांस मान्यता देत आहे –

१) धारावी येथील क्रिडा संकुल उभारण्याच्या कामासाठी सुधारीत खर्चाच्या रु. १६.६५ कोटी व तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनामा व अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

२) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास सद्यस्थितीत स्विकृत निविदा रकमेच्या २.५%+ सेवा कर या मोबदल्यावर वाढीव कामासाठी सध्याच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून त्या अनुषंगाने होणा-या अंदाजित वाढीव खर्चास रु. २९.०० लाख + सेवा कर यांस मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास व संबंधितांना आवश्यक ती मुदतवाढ देण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता (पश्चिम द्रुतगती महामार्ग ते साकीनाका) या कामाच्या वाढीव खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

१५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचे काम मे, २००८ मध्ये पूर्ण झालेले आहे. परंतु कामाच्या वावामध्ये बरीच वाढ झाली. त्याबाबतची मुख्य कारणे कार्यसूचीमध्ये दर्शविण्यात आली आहेत. त्यापैकी मुख्य कारण म्हणजे विविध नाल्यांवरील बांधावयाच्या पूलाच्या काटछेदात वाढ करावी लागली. तसेच रस्त्याच्या बाजूच्या पर्जन्य वाहिन्यांच्या आकारमानात वाढ करावी लागली व अतिरिक्त RCC बॉक्स ड्रेनस बांधावा लागला याशिवाय काही अतिरिक्त बाबी मंजूर कराव्या लागल्या. उदा. झोपड्या हटविणे, जल वाहिन्यांचे स्थलांतर करणे इ. या शिवाय पावसाळ्यापूर्वी साफसफाई करण्यासाठी मशिनरी इ. ची तरतूद करावी लागली.

१५.२ या प्रस्तावावर चर्चा करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी अशी विचारणा केली की, अंदाजपत्रक करताना सल्लागारांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार तरतूद करणे

आवश्यक होते. त्यामध्ये अशा दृष्टीने वाढ झाली. म्हणजेच सल्लागारांनी त्यांचे काम व्यवस्थित केले नसावे. याबाबत खुलासा करताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, जुलै, २००५ नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने क्रॉस ड्रेनेज तसेच पूल बांधताना खबरदारी म्हणून अतिरिक्त काटछेद देण्याचे धोरण स्विकारलेले आहे व त्यानुसार यामध्ये वाढ झालेली दिसून येते. पुढे श्री.मिराणी यांनी अशी विचारणा केली की, पावसाळ्या पूर्वीची नाला सफाईची कामे कंत्राटाच्या अटी व शर्तीमध्ये अंतर्भुत आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी त्यांनी कंत्राटाच्या तरतुदीची प्रत दाखविण्यास सांगितले. यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, कंत्राटा अंतर्गत झालेल्या वाढीव कामाचा तपशिल व कंत्राटातील तरतुदी श्री.मिराणी यांना दाखविण्यात याव्यात.

१५.३ पुढे चर्चा करताना श्री.मिराणी, सदस्य यांनी असेही सांगितले की, जल वाहिन्या टाकणे किंवा स्थलांतरीत करणे ही कामे मूळ अंदाजपत्रकातच धरणे आवश्यक होते. यावर मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, रस्ता रुंदीकरण करण्यापूर्वी झोपड्यांचे जाळे असल्यामुळे याबाबत प्रत्यक्ष काय कामे करावी लागतील, याचा अंदाज घेणे शक्य झाले नाही. तसेच याबाबतचा तपशील बृहन्मुंबई महानगरपालिकेकडेसुध्दा उपलब्ध नाही.

१५.४ त्यानंतर, श्री.मिराणी, सदस्य यांनी कंत्राटदरातील विचारणा केलेल्या कंत्राटातील तरतूदी व अतिरिक्त झालेल्या कामाचा तपशिल त्यांना दाखविण्याच्या अधीन राहून बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.११७३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम (पश्चिम द्रुतगती महामार्ग ते साकीनाका) करण्यासाठी मे.शापुरजी पालनजी यांना दिलेल्या मूळ कामाच्या रु.४१,२४,३३,१४४/- एवढया सुधारीत खर्चास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई महानगर प्रदेशासाठी मानवी विकास अहवाल (हयुमन डेव्हलपमेंट रिपोर्ट) तयार करणे व यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची मदत घेणे.**

कार्यकारी समितीने बाब टिप्पणीत नमूद केलेल्या विषयाची आणि यासंबंधी प्राधिकरण करीत असलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग १ व ३ च्या कामासाठी ठेकेदारास मुदतवाढ देणे व त्यांच्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**पटल बाब क्र.१ : मुंबई महानगर क्षेत्रामधील पश्चिम उप-प्रदेशात घाऊक प्रमाणात पाणी पुरवठा करण्यासाठी सुर्या एकात्मीकृत पाणी पुरवठा योजनेचे नियोजन संकल्पन व प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत.**

सुर्या नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाचे नियोजन, सुसाध्यता अहवाल तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे यासाठी कामाच्या व्याप्तीनुसार तांत्रिक सल्लागार नेमण्याबाबत चर्चा झाली. श्री.मिराणी, सदस्य यांनी या निविदा निश्चित करताना प्राधिकरणाच्या बाहेरील प्रतिनिधीचा समावेश केला होता का असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी अशी कार्यवाही करण्यात आली होती व निविदा निश्चिती प्रक्रियेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातील मुख्य अभियंता यांचा समावेश होता असे स्पष्ट केले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : –

**<u>ठराव क्र.११७४</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे सुर्या नळ पाणी पुरवठा योजनेची नियोजन, संकल्पन, सविस्तर प्रकल्प अहवाल, कामाच्या निविदा प्रक्रिया व कामावर देखभाल करण्यासाठी मे.शहा टेक्निकल कन्सलटंट्स प्रा.लि. आणि मे.टंडन ॲण्ड असोसिएट्स (जे.व्ही) यांची निविदा लघुत्तम असून त्यांना रु.२०,८५,९८,३९२/- (रु.१८,५६,८४,८७८ + सेवा कर (१२.३४%) रु.२,२९,१३,५१४/-) सर्व कर व सेवाकरासहित किंमतीचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे, देय होणा-या संभाव्य बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.२</u> : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, प्रमुख, सामाजिक विकास कक्ष या पदासंबंधीच्या सेवाप्रवेश नियमास व नेमणूकीस मंजूरी देण्याबाबत.</u>**

या प्रस्तावाबाबत मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर क्षेत्र हे आर्थिक उलाढालीचे व व्यवहाराचे केंद्र झाले आहे. त्या दृष्टीने प्राधिकरणाने प्रादेशिक स्तरावर मुलभूत सुविधावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे धोरण निश्चित केले आहे. या बाबतची कामे पार पाडण्यासाठी प्राधिकरणामध्ये वेळोवेळी तांत्रिक व अतांत्रिक

अधिकारी/कर्मचारी यांची नवीन पदे निर्माण करुन आवश्यक त्या पदांचे त्या समकक्ष पदात रुपांतर करुन पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. यातील काही पदे रिक्त असून ही पदे सरळसेवेने/पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.

त्यानंतर, मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुलभूत सोयीसुविधा बरोबर विकास प्रक्रियेला सामाजिक संदर्भाची आवश्यकता असल्याने प्राधिकरणात सामाजिक विकास कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाकरिता प्रमुख, सामाजिक विकास कक्ष पद रुपांतरीत निर्माण करण्यात आले आहे. या पदावरील नियुक्तीकरिता सेवाप्रवेश नियम विहीत करुन सदरचे पद श्री.वि.ग.पाटील, वरिष्ठ नियोजक, नियोजन विभाग यांची पदोन्नतीने विभागीय पदोन्नती समितीच्या मान्यतेने दिनांक २.८.२०१० रोजी भरण्यात आलेले आहे. या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती केली. तसेच प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाकरिता विहीत करण्यात आलेले दिनांक २५.६.२००४ चे सेवाप्रवेश नियम अधिक्रमित करुन यामध्ये सरळसेवा बरोबरच पदोन्नतीचा सेवाप्रवेश पर्याय समाविष्ट करुन सुधारीत सेवाप्रवेश नियम सादर करण्यात आलेले होते. त्यास मंजूरी देण्याची विनंती केली.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११७५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीतील परिच्छेद ३ मध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन, जोडपत्र क्र.१ प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग व जोडपत्र क्र.२ प्रमुख, सामाजिक विकास कक्ष या पदांच्या सेवाप्रवेश नियमास मान्यता देत आहे.

..३७/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.वि.ग.पाटील, प्रमुख, सामाजिक विकास कक्ष यांचे रुपांतरीत केलेले प्रमुख, सामाजिक विकास कक्ष पद, ६व्या वेतन आयोगानुसार P.B.IV रु.३७४००-६७०००+ ग्रे.वे.रु.८९००/- असून या पदावर दिनांक २ ऑगस्ट, २०१० पासून श्री.वि.ग.पाटील यांची प्रमुख, सामाजिक विकास कक्ष या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्यास आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २ च्या कामासाठी नेमलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणे व त्यांच्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******************